ISSN 2349-1027

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - II, Issue - IV, Vol.- I Feb. 2015 to July 2015

EDITOR IN CHIEF
AMBUJA MALKHEDKAR

Vol. I, Issue : IV
IVVR
Half yearly Research Journal
ISSN 2349-1027
Feb. 2015 To July 2015

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Use of Lignite Coal as Fuel in Chemical Looping Combustion | Yogesh Khirale, Sachine H. Kshirsagar, S. N. Nemade, Dr. P. V. Thorat | 1-5 |
| 2 | Comparision of Socio-Economic Status of Inter-Collegiate Kabddi and Kho-Kho Players | Ramesh D. Patre | 6-11 |
| 3 | Sponsorship In Sports | Dr. Abhijit S. More | 12-17 |
| 4 | Change In Women Caused By Self Help Group : A Study | Mahesh Ganwar | 18-21 |
| 5 | दुष्यंत के बाद की हिन्दी गजल - दशा और दिशा | डॉ. अंबुजा मलखेडकर | 22-26 |
| 6 | २१ वी सदी के हिन्दी कहानियों में चित्रित मानवीय संवेदना | मोहिनी रणजित कुटे | 27-31 |
| 7 | अज्ञेय की कविता में चेतना के विविध आयाम | गुंडप्पा राचप्पा | 32-34 |
| 8 | दलित साहित्य की समीक्षा | शेख शादुल महेताब | 35-37 |
| 9 | कविता और राजनिती | डॉ. संगीता शरणपा उम्पे | 38-41 |
| 10 | १९६० के बाद मराठवाडा की महिला कहानी रचनाकारों का स्त्री - विमर्श चित्रण | प्रशांत बब्रुवान क्षीरसागर | 42-45 |
| 11 | कबीर की प्रासंगिकता | ज्ञानेश्वर मा. दरेकर | 46-48 |
| 12 | भारतातील विशेष आर्थिक क्षेत्राचा चिकित्सक अभ्यास | डॉ. बालाजी जी. कांबळे | 49-59 |
| 13 | पारंपरिक लोकक्रीडा | डॉ.शरद वाघोळे | 60-63 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय व सामाजिक विचार | डॉ. मालिनी मोहन वडतकर | 64-67 |
| 15 | जागतिकीकरण आणि भारतातील महिला सक्षमीकरण | अशोक मोटे | 68-70 |
| 16 | लिंगभाव विषमता आणि स्त्रियांचे आरोग्य | डॉ. संध्या बीडकर | 71-77 |

Indo Western Researchers (IWR) | IWR

ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Vol. I, Issue : IV
Feb. 2015 To July 2015
www.irasg.com

Research Paper 16 Sociology

# लिंगभाव विषमता आणि स्त्रियांचे आरोग्य

डॉ. संध्या बीडकर
समाजशास्त्र विभाग,
मिलिया महाविद्यालय,
बीड, जि. बीड

**प्रस्तावना :**

१९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि त्याला जोडूनच १९७५ते१९८५ महिला दशक, सर्व जगभर साजरे करण्यात आले. तेव्हापासून स्त्री विषयक अभ्यास, स्त्री विषयक प्रश्नांची जागरुकता व जाणीव यांची चर्चा सर्वच स्तरावर जाहीरपणे होऊ लागली. तसेच १९८५ साली नैरोबी येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत महिला सक्षमीकरणाची घोषणा करण्यात आली. भारतसरकारने इ.स. २००० हे वर्ष स्त्रीयांचे सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषीत केले. आणि लगेचच २००१ साली महिलांसाठी स्वतंत्र धोरणही घोषीत केले. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर लिंगभावाची संकल्पना अनेक व्यासपीठावर  चर्चीली जाऊ लागली आणि अभ्यासक्रमातही विद्यापीठ पातळीवरुन तिचा समावेश करण्यात आला. सर्व सामान्यपणे समाजशास्त्रातून विशेष करुन स्त्री विषयक अध्ययनाच्या अनुषंगाने लिंगभावाची संकल्पना हा एक प्रमुख अध्ययन विषय बनला. या संकल्पनेचा अर्थ आणि अन्वयार्थ अनेक विद्वानांनी व संशोधकांनी वेळोवेळी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. आणि त्या अनुरोधाने स्त्री विषयक प्रश्नांची चर्चा होऊ लागली. प्रामुख्याने "लिंगभाव असमानता" या संकल्पने भोवतीत हे सर्व प्रश्न चर्चीले जाऊ लागले.

"लिंगभाव असमानता" ही संकल्पना मुळातच स्त्री पुरुषांना समाजात मिळणारे वेगळे स्थान व दर्जा वेगळा मानसन्मान त्यांना मिळणारे हक्क आणि एकूणच त्यांच्या बाबतीत दिसून येणारी  असमानता आणि विषमता यांच्याशी निगडीत आहे. ढोबळ अर्थाने स्त्री पुरुषांचे स्थान व भूमिका याबाबतीत समाजात कसा भेद केला जातो. हे लिंगभाव या संज्ञेमुळे स्पष्ट होते. स्त्री पुरुषासंबंधीच्या सामाजिक वास्तवाचे निर्देशन करण्यासाठी एक साधन म्हणून ही संकल्पना वापरली जाते. स्त्री पुरुषांच्या बाबतीत जैविक आणि नैसर्गिक दृष्टीने असणारा भेद सामाजिक सांस्कृतिक भेदाचा आधार म्हणून वापरण्याची प्रक्रिया ही मुळातच अव्यवहार्य आहे. यामागे प्रामुख्याने पितृसत्ताक व्यवस्था हे प्रमुख कारण आहे. याशिवाय दुसरा कोणताही समर्पक आधार असू शकत नाही. स्त्रियांचे दुय्यमत्व हे पुरुषप्रधान संस्कृतीतून निर्माण झाले

आहे. त्यामुळे लिंगभाव असमानतेची संकल्पना विचारात घेतांना पुरुषप्रधान संस्कृती आपण टाळू शकत नाही. ही संकल्पना अनेक स्त्रीवादी विचारवतांनी आपल्या अभ्यासक्रमातून मांडलेली आहे.

लिंगभाव ही संकल्पना सर्व प्रथम मांडणाऱ्या स्त्रीवादी विचारवंतापैकी एक जेष्ठ विचारवंत "ॲन ओकले" - यांनी असे म्हटले आहे की, लिंगभाव ही एक सांस्कृतीक बाब आहे. लिंगभावाला जैविक मूळ नसते. म्हणजेच लिंगभावातील संबंध नैसर्गिक अजिबात नसतात. लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्य निर्मित आहे. तो सामाजिक, सांस्कृतिक असतो. तसेच तो बदलता असतो. (कमला भसीन २०१०) या संदर्भात नैसर्गिक लिंगभेद कृत्रिमपणे सामाजिक लिंगभावात पुरुषप्रधान व्यवस्थेने रुपांतरीत केला असे. "लॉडिया व्हॉन वेरलॉक" यांनी म्हटले आहे. हे मतप्रदर्शन देखील लिंगभाव हा पुरुषप्रधान व्यवस्थेतूनच निर्माण झाला, असे म्हणण्यास पुष्टी देणारे आहे. पुरुषसत्ता अथवा पितृसत्ता ही एक सामाजिक संरचना आहे, तसेच ती एक विचार प्रणालीही आहे. त्यानुसार पुरुष हे श्रेष्ठ ठरतात आणि पर्यायाने स्त्रिया म्हणजे परावलंबी, उपभोगवादी ही विचारसरणी दृढ होते.

स्त्री पुरुषात लैगिंक भेद हे जन्मजातच असतात आणि तेव्हापासूनच लिंगभावाची चौकटही त्यांच्याभोवती समाज निर्माण करतो. त्यांच्यावर केले जाणारे संस्कार, आणि त्यांच्या सोबतचा व्यवहारही वेगळा असतो. म्हणजे एकूणच लिंगभावाची प्रक्रिया सामाजिककरणाच्या प्रक्रियेशी निगडीत असते. त्यामुळे त्यांची होणारी जडणघडण त्यांचे होणारे वर्तन आणि क्रिया या सर्वातून लिंगभाव स्पष्ट होत जातो.

समाजशास्त्राज्ञांच्या मते स्त्री पुरुषातील भेद हे जैविक मानसिक गुण वैशिष्ट्यापेक्षा सामाजिक पर्यावरणावर आधारित असतात. ज्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात स्त्री पुरुष राहतात. तेच वातावरण त्यांच्यातील विभेदाला कारणीभूत ठरते असे समाजशास्त्राज्ञांना वाटते. "एल.बी. पेकीन"- यांनी असे म्हटले आहे की, स्त्री पुरुषांच्या आवडीचे विषय वेगवेगळे असतात त्या बाबतीत समानता नसते. त्यामुळे शैक्षणिक धोरणांची उभारणी स्त्री पुरुष विभेदाला अनुसरुन केली जाते. "मार्गरेट मीड" या मानवशास्त्रज्ञ विदूषीने निरनिराळ्या संस्कृतीच्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, स्त्री पुरुषातील बौध्दिकता त्यांची अभिरुची यातील फरक हा ते ज्या संस्कृतीत वाढतात. त्यामुळे निर्माण होत असतो. स्त्री पुरुष श्रम विभाजनातील अधिक लवचिकता 'मिडने' स्पष्ट केली आहे. स्त्री-पुरुष दोघांना सारख्याच प्रमाणात संधी मिळत नसते. त्यामुळे स्त्री पुरुषातील विभेद सांस्कृतिक बाबीवर आधारलेला असतो.

"जॉर्ज सेव्हर्ड" - यांनी स्त्री-पुरुष विभेदाला सामाजिक घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत मानले. स्त्री पुरुषाच्या बौध्दिकतेत जो फरक आढळतो तो प्रामुख्याने स्त्री पुरुषांना समाजात जी भिन्नतेची वागणूक मिळते त्यावर आधारित असतो. स्त्रियांना पुरेशी संधी मिळत नाही. त्यामुळेच स्त्री पुरुषातील विभेद ह्या आधारेही केला जातो. यावरुन हेच स्पष्ट होते की, लिंगभावाची संकल्पना सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थेशी निगडित आहे आणि त्यामुळेच लिंगभाव विषमता हा पूर्वग्रह दूषीत विचारसरणीचा भाग आहे.

**आरोग्याची सकंल्पना :**

आरोग्याची व्याख्या नेहमी शरीराशी निगडीत अशा पध्दतीने केली जाते. आजारपण रोग, अस्वच्छ परिस्थिती आणि आहारामधील कमतरता यांचा संदर्भ घेऊन आरोग्यांची व्याख्या केली जाते. पण आरोग्य म्हणजे निव्वळ जगणे नव्हे तर ते मानसिक व शारिरीक आरोग्य आणि स्वत:च्या शरीराशी एक सकारात्मक नाते असते. वर्ग जात राजकीय व सामाजिक स्थान या गोष्टीही व्यक्तींचे किंवा सामाजिक

समूहांचे आरोग्य कसे आहे. हे ठरविण्या विषयीचे महत्वाचे घटक आहे. अर्थात आरोग्याची संकल्पना मांडण्याचा आणि त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी व अभ्यासकांनी वेगवेगळ्या पध्दतीने केला आहे.

"आरोग्यम धन संपदा" किंवा 'शरीरधर्म आद्य खलू धर्म साधनम' ही नेहमीच्या प्रचारातील आरोग्याची संकल्पना म्हणून आपण स्वीकारतो त्याचप्रमाणे वैद्यकीय दृष्टिकोनातून रोगाचे अस्तित्व नसणे, अथवा जागतिक आरोग्य संघटनेच्या अनुषंगाने शारीरीक, मानसिक अध्यात्मिक आणि सामाजिक स्थितीचे पूर्ण निकोप अस्तित्व अशी आरोग्याची संकल्पना विशद केली जाते. संक्षेपाने विचार केल्यास सर्व दृष्टीने चांगल्या स्थितीत असणे म्हणजे अरोग्य होय. तसेच चांगले आरोग्य ही एक प्रकारे मानवी संपत्ती असून ती विकास प्रक्रियेशी निगडीत आहे. कारण चांगले आरोग्य हे चांगल्या समाजाचे निर्देशक आहे. अर्थात असे चांगले आरोग्य सर्वानाच लाभते असे नाही. कारण प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या आरोग्याची कशी काळजी घेते किंवा तिच्या आरोग्यविषयीच्या कल्पना काय असतात, व आरोग्य चांगले ठेवण्यासाठी ती कोणते प्रयत्न करते यावरही आरोग्याची संकल्पना निर्भर असते.

**स्त्रियांचे आरोग्य :**

स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न म्हणजे निव्वळ त्यांच्या विशिष्ट रोग-आजारांचा प्रश्न असा मर्यादित अर्थ न मानता, त्यांचा विचार अधिक व्यापकपणे करावा ही जाणीव स्त्री विचारवंतांना देखील अलिकडे होऊ लागली आहे. आरोग्य म्हणजे आपल्या शरीराचे स्वरुप व प्रक्रिया यांचे ज्ञान करुन घेणे. शरीराचा आसपासचा पर्यावरणाशी काय संबंध असतो याचे निरिक्षण करुन विश्लेषण करणे आणि या सर्व प्रक्रियांमध्ये समतोल साधने अशी व्याख्या १९८९ साली नारी अत्याचार विरोधी मंचच्या एका परिषदेत वाचल्या गेलेल्या प्रबंधात केली आहे की "आरोग्याशी आपण स्वतः निगडीत असतो, ती एक वैयक्तिक बाब तर असतेच पण त्याचबरोबर मानवी समाजातील सर्वसामान्य प्रवाहाचे प्रतिबिंबही त्यात उमटलेले असते. म्हणून आरोग्याच्या प्रश्नाला महत्व आहे. सर्व जगातील सर्व मानव जातीचा हा सामाईक प्रश्न आहे. त्यामुळे परस्पर सहकार्य साधण्यासाठी विशेषतः समाजाची रचना, मूल्ये बदलली पाहिजेत म्हणून पर्याय शोधणाऱ्या संघटनांना एकत्र आणण्यासाठी पहिले पाऊल उललण्याच्या दृष्टीनेही आरोग्याचा प्रश्न महत्वाचा आहे."

तसेच मानवी जगाचा निम्माभाग स्त्रियांची व्यापलेला आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ अर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. साहजिकच त्यांच्या विषयीच्या आरोग्यावरील गुंतवणूक म्हणजे एका अर्थाने विकासबद्दल गुंतवणूक आहे. तसेच ही गुंतवणूक म्हणजे भविष्यकाळात येणाऱ्या स्त्रीयांसाठी केलेली गुंतवणूक व तरतुद ठरणार आहे. हे जरी खरे असले तरी वास्तव मात्र भिन्न आहे आणि ते लक्षात घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखातून करण्यात आला आहे. पुरुषांच्या तुलनेंत स्त्रीया दिर्घायूषी आहेत. चांगले जीवनमान आयुष्यभर जगता यावे अशी त्यांचीही अपेक्षा आहे. परंतु त्यांच्या आरोग्याच्या आड लिंगभाव विषमता, किंवा त्याच्या आरोग्याच्या बाबतीत केला जाणारा पक्षपातीपणा जाणीवपूर्वक विचारात घेणे गरजेचे आहे.

**Resproductive Health:**

"A State in which people have the ability to reproduce and regulate their

fertility women are able to go through pregancy and childbirth safely. The outcome of preganacy is successful in terms of maternal and infant survival and well being and couples are able to have sexual relations free from fear of pregnancy and contracting diseases" (Mohmood Fathalla WHO १९८८)

**प्रजननक्षम आरोग्य म्हणजे प्रामुख्याने :**

१. पती पत्नीची अपत्य निर्मितीची क्षमता तसेच सुरक्षित आणि आरोग्यदायी अपत्य निर्मिती.

२. गर्भधारणा आणि सुरक्षित व यशस्वी मातृत्व आणि जन्मलेल्या मुलांचा क्षमतापूर्ण विकास.

३. पती-पत्नीना मिळणारे आनंदी लैगिंक समाधान.

थोडक्यात प्रजननक्षम आरोग्यामध्ये कुटूंब नियोजन सुरक्षित मातृत्व, बालकाची सुरक्षितात, लैगिंक रोगाचे निरोधन आणि उपलब्ध सेवा सुविधानुसार दर्जात्मक आरोग्य या सर्वाचा समावेश प्रजननक्षम आरोग्यामध्ये होतो. प्रजननक्षम आरोग्याचा संबंध केवळ स्त्रीच्या १५ ते ४५ वयादरम्यान होणारी प्रजोत्पादन क्षमता किंवा प्रजननाचा कालखंड यांच्याशी संबंधीत नसून संपूर्ण आयुष्यभर पती-पत्नीचा आरोग्यादायी सहवास हा त्यामध्ये अपेक्षित आहे. प्रजननाचा अधिकार हा एक मूलभूत अधिकार असून त्यानुसार स्त्रीला स्वतंत्रपणे व जबाबदारीने आपल्याला किती मुले, किती अंतराने आणि केव्हा व्हावीत हे ठरविण्याचा अधिकार प्राप्त होतो.

**मुलीचा जन्म आणि लिंगभाव विभेद :**

स्त्रीयांच्या आरोग्याचा प्रश्न हा प्रामुख्याने एकात्कि आरोग्य विषयक दृष्टीकोनाचा भाग आहे. स्त्रिया प्रथमतः माणूस आहेत. आणि घर व घरकाम मातृत्व हे त्यांचे विश्व आहे. परंतु परंपरेने चालत आलेली सामाजिक, सांस्कृतिक निती नियामांची चौकट त्यांच्यावर असणारे दुय्यमतेचे जोखड आणि एकूणच त्यांच्या बाबतीत केला जाणारा पक्षपात हा त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्व विकासाला मारक ठरतो. साहजिकच त्यांच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेणे हे त्यांच्या व समाजाच्या दृष्टीने आवश्यक आहे. स्त्रिच्या कुटुंब विकासासाठी खरे तर तिच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे हे सामाजिक बंधन मानले गेले पाहिजे. त्यासाठी प्रभावी जनजागृती करणे, आणि लोकशिक्षण हाती घेणे आवश्यक आहे. तसेच लिंगभाव संवेदशीलता निर्माण करणे तितकेच गरजेचे आहे.

**गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र :**

प्रसवपूर्व निदानतंत्राच्या दुरुपयोगाला आळा घालून स्त्री लिंगी गर्भाची हत्या थांबविण्यासाठी केंद्र शासनाने २० सप्टें.१९९४ पासून प्रसवपूर्व निदानतंत्र हा कायदा मंजूर केला आहे. सन २००३ मध्ये या कायद्यात सुधारणा केली असून त्याचे नामांतर गर्भधारणेपूर्वी व प्रवसपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध अधिनिमय असे केले आहे.) महाराष्ट्राने का कायदा १९८८ सालीच लागू केला. अशा प्रकारे कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तरीही २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १००० पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९२२ इतकेच होते. तसेच ० ते ६ वयोगटातील मुलामुलींच्या बाबतीत हेच प्रमाण दर एक हजार मुलांच्या मागे फक्त ९१३ मुली इतके होते. तर २०११ मध्ये ८८३ इतके झाले. यामुळे नैसर्गिकरित्या मुलामुलींच्या जन्माचा समतोल विघडतो. तथापि वंशाला दिवा हवा आणि वृध्दपणी जगण्याला आधार म्हणून समाजामध्ये मुलाच्या जन्माचा अट्टाहास धरला जातो. त्यामुहे भविष्यात सामाजिक

अडचणी निर्माण होणार आहेत. म्हणून गर्भ कोणताही असला तरी तो जीव सुरक्षित करण्याच्या दृष्टीने लिंगभाव विषमता नाहीशी करण्यासाठी समाज जागृती होणे आवश्यक आहे. केवळ कायदा करुन हा प्रश्न सुटणार नाही तर त्यासाठी महिलांचा शैक्षणिक स्तर वाढविणे, महिलांचे दारिद्र्य दूर करणे याबाबतीतही समाज जागृती होणे आवश्यक आहे.

या संदर्भात १९८६ मध्ये "लक्ष्मी लिगम" यांनी केलेल्या संशोधनातून काही धक्कादायक निष्कर्ष हाती लागले त्यानुसार अशा तऱ्हेची प्रसवपूर्व चाचणी २४८ रुग्णालयात करण्यात आली आणि दरवर्षी सुमारे १६ हजार गर्भलिंग निदान मुंबई महानगरात झाल्याने निष्पन्न झाले. १९८३ ते ८६ या तीन वर्षात सुमारे ७८ हजार स्त्री गर्भाची हत्या करण्यात आली हे उघडकीस आले याचा परिणाम अर्थातच लिंग गुणोत्तरावर झाला.

याप्रमाणेच "संजीव कुलकर्णी" यांनी केलेल्या सर्व्हेमधून मुंबईतील एक हजार स्त्रीरोग तज्ञांच्या अभ्यासातून असे दिसून आले की, त्यामधील ७०% खाजगी व्यवसाय करणारे होते आणि दर महिन्यातील हे खासगी व्यावसायिक मिळून सुमारे २७० गर्भलिंग चाचण्या करीत असत. यातील गर्भलिंग निदान करुन घेणाऱ्या स्त्रियांचा वर्ग हा उच्च मध्यमवर्ग आणि मध्यमवर्ग असल्याचे निष्पन्न झाले. खालच्या वर्गातील स्त्रीया असे लिंगनिदान करण्यासाठी येत नाहीत असे सुमारे ८५% डॉक्टरांनी मत प्रदर्शन केले यावरुन हा प्रश्न सुशिक्षित स्त्री वर्गाशी जोडला गेल्याचेच निष्पन्न होते.

स्त्रिया मुलांना जन्म देतात पण त्या प्रक्रियेत माता मृत्यूची घटना कशी घडते आणि आपल्या देशात माता मृत्युचे प्रमाण अधिक का आहे, याचा कधीही गांभीर्याने विचार करण्यात आलेला नाही. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये एक लाख जिवित जन्माच्या मागे फक्त दहा स्त्रिया मृत्यू पावतात. तर भारतात तेवढ्याच जिवित जन्मामागे पाचशे स्त्रिया मृत्यु पावतात याचे कारण म्हणजे लिंगभावात्मक विषमता हेच आहे. कारण दयनीय प्रसुती विषयक सेवा सुविधा, प्रसती विषयक अपूऱ्या ज्ञानावर आधारित कार्यपध्दती, दुर्लक्षित दळण वळण सुविधा आणि संसर्गजन्यतेचे वातावरण या बाबी त्याला कारणीभूत आहेत. ग्रामीण भागात विशेष करुन वैद्यकिय सेवांचा असणारा अभाव अशा सुविधा असतील तर त्या ठिकाणी असणारा कर्मचारी वर्ग हा अपूऱ्या ज्ञानाचा असतो आणि एकूणच स्त्रिया विषयीचा सामाजिक पक्षपात हा या सर्वाला कारणीभूत ठरतो. या सर्वच गोष्टी त्याच्या आरोग्याला घातक ठरतात.

**स्त्री अर्भक हत्या व स्त्री बालहत्या :**

भृणहत्या तर होतच असे. मुलगी म्हणून जन्माला आल्यावर आई वडीलच तिची हत्या करु लागले. शेकडो वर्ष दबावाखाली, अन्याय सहन करीत राहिल्यामुळे स्त्री स्वत:ची शक्ती हरवून बसली. शेक्सपियर ने म्हटले आहे- "Frality the name of woman" तु अबला आहेस असच सतत तिच्या मनावर बिंबवल गेल. त्यामुळे तिची अन्यायाला प्रतिकार करण्याची शक्ती सुध्दा नाहीशी झाली. तिला स्वत:लाच स्त्री जन्म नकोसा झाला. समाजाचे अध:पतन सुरु झाले.

एक वर्षाच्या आतील व १ ते ३ वर्ष वयाच्या दरम्यान ज्या मुलीची जन्मानंतर हत्या केली जाते त्याला अनुक्रमे स्त्री अर्भक व स्त्री बालहत्या या नावाने ओळखले जाते. ही प्रथा म्हणजे एक प्रकारे एकूण लोकसंख्येतील स्त्रीयांचे प्रमाण कमी करण्याचा अमानूष प्रकार आहे. यामुळे लोकसंख्येत लिंग गुणोत्तरावर परिणाम होऊन एक प्रकारच्या जैविक असमतोल निर्माण होतो अशा प्रकारे जन्माला आल्यांनतर मुलीची

हत्या करण्याची प्रथा भारतात बऱ्याच प्रांतात आढळते. तरीही राजस्थानमध्ये ही प्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित असल्याचे दिसते. राजस्थान मधील रजपूत खेड्यात गेल्या पन्नास वर्षात एकही विवाह इच्छुक वराने भेट दिलेली नाही कारण त्या खेड्यात विवाह योग्य मुलीच नाहीत आणि हे केवळ स्त्री बालहत्येमुळे घडून आले. मुलीला लग्नात मोठ्या प्रमाणावर हुंडा द्यावा लागतो आणि कनिष्ठ सामाजिक दर्जा यामुळे ही अघोरी प्रथा त्या खेड्यात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**स्त्रीयांचे घटते लिंग गुणोत्तर :**

भारतात लोकसंख्येतील स्त्रीयांच्या घटत्या प्रमाणाला काही ऐतिहासिक आधार आहेत. ही केवळ सद्यस्थितीतील घटना नसून स्वातंत्र्याच्या आधीपासूनच लिंग गुणोत्तरातील ही तफावत आढळून येते. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी १७८९ मध्ये स्त्री बालहत्येच्या आणि घटत्या स्त्री प्रमाणाच्या काही नोंदी करुन ठेवल्या आहेत. या संदर्भात "एल.एस.विश्वनाथ" (०१ सप्टें. २००१) यांनी १९३१ पर्यत या संदर्भात शिरगणती नुसार जो आढावा घेतला त्यातून असे स्पष्ट होते की गुजरातमधील लेवा पाटीदार आणि रजपूत, पंजाब प्रांतातील जाट, कुत्री आणि मोगल ब्राम्हण आणि उत्तर प्रदेशातील आहिर जाट, रजपूत आणि गुजर या जातीमध्ये स्त्री बालहत्या सर्रास घडून येत असत आणि त्याचा परिणाम घटत्या लिंग गुणोत्तरावर झालेला दिसतो. १८८१ च्या जनगणनेनुसार लिंग गुणोत्तरातील स्त्रीयांचे प्रमाण जाट समाजात ८१५, गुजर ८३१, आहिर ९७६ असे होते. तर १८८१ च्या शिरगणतीनुसार पाटीदार समाजात स्त्रींयाचे हेच प्रमाण ६५९ इतके कमी झालेले दिसते. हे केवळ स्त्री बालहत्येच्या प्रथेमुळे घसरलेले दिसते. ब्रिटीश कालखंडात ही प्रथा प्रभावी जातीमध्ये होती हे लक्षात घेण्यासारखे आहे.
दाखल्यासाठी पुढील कोष्टकांचा आधार घेता येतो.

**काही राज्यातील लिंग गुणोत्तराचा कल**

| राज्य | ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तराचे प्रमाण | | |
|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | फरक |
| हरियाणा | ८३० | ८१९ | -११ |
| पंजाब | ८४६ | ७९८ | -४८ |
| राजस्थान | ९०९ | ८८३ | -२६ |
| महाराष्ट्र | ९१३ | ८८३ | -३० |
| गुजरात | ८८६ | ८८३ | -३ |
| उत्तर प्रदेश | ९१६ | ८९९ | -१७ |
| बिहार | ९४२ | ९३३ | -९ |
| ओडीसा | ९५३ | ९३४ | -१९ |
| आसाम | ९६५ | ९५७ | -८ |
| आंध्र प्रदेश | ९६१ | ९४३ | -१८ |
| **भारत** | **९२७** | **९१४** | **-१३** |

**स्त्रोत जनगणना २००१-२०१२**

"विभुती पटेल" यांनी केलेल्या Sons are Rising: Daughters Setting या शोध निबंधातून काही निष्कर्ष असे निघाले आहेत की, भारतातील घटते लिंग गुणोत्तर एका नवीन वळणावर येवून ठेपले